जनसंपर्क कक्ष
0 2 AUG 2025 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर





कोल्हापूर : लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. श्रीकृष्ण महाजन आदी. दुसऱ्या छायाचित्रात राजारामपुरी येथील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्याला अभिवादन करताना नॅशनल ब्लॅक पँथर पक्ष, वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी, कार्यकर्ते.

# लोकमान्य टिळक, अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन

## शहर परिसरातील विविध संस्था, संघटनांकडून प्रतिमा पूजन, व्याख्याने यासह अन्य कार्यक्रमांचे आयोजन

**लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती आणि लोकमान्य टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त शहरात ठिकठिकाणी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यानिमित्त विविध संस्था, संघटनांकडून व्याख्यानाचे आयोजन केले होते.**

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शाळा, महाविद्यालयात शिक्षकांनी दोन्ही महापुरुषांच्या कार्याची माहिती विद्यार्थ्यांना दिली. तसेच राजारामपुरी येथील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्याला विविध संघटनांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

**शिवाजी विद्यापीठ**

शिवाजी विद्यापीठात लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. तानाजी चौगुले, डॉ. धनंजय सुतार, डॉ. शरद बनसोडे, डॉ. रामचंद्र पवार, डॉ. सागर डेळेकर, डॉ. प्रभंजन माने, डॉ. अक्षय सरवदे, डॉ. तृप्ती करेकट्टी, डॉ. राजश्री बारवेकर, डॉ. मच्छिंद्र गोफणे, गजानन पळसे, डॉ. प्रमोद पांडव, डॉ. उत्तम सकट आदी उपस्थित होते.

**शहाजी महाविद्यालय**

लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या जयंती व लोकमान्य टिळक यांच्या पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करूअ अभिवादन करण्यात आले. डॉ. आर. डी. मांडणीकर, समृद्धी गुरव, ऋतिका माने, ज्योती कोरवी, समीक्षा माने, शुभांगी पुजारी, मानसी तरटे, आर्यन फाले यांनी मनोगते व्यक्त केली. यावेळी डॉ. डी. के. वळवी, डॉ. पल्लवी कोडक, डॉ. शिवाजी रायजादे, डॉ. रचना माने, डॉ. के. एम. देसाई, डॉ. प्रशांत पाटील, डॉ. पी. बी. पाटील,आदी उपस्थित होते.

**हर्षवर्धन सामाजिक कल्याण संस्था**

राजारामपूरी ६ वी गल्ली येथे हर्षवर्धन सामाजिक कल्याण संस्थेचे संस्थापक मा. रणजित औंधकर यांनी अण्णाभाऊ साठे आणि लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालुन अभिवादन केले. यावेळी प्रशांत अवघडे, पोलिस बॉईज मोहिते डावाळे, निलेश डावाळे, प्रशांत डावाळे, गणेश औंधकर सानिया औंधकर, रितीशा औंधकर, व आदीनाथ साठे, तसेच कार्यकर्ते उपस्थित होते.

**गॉडफादर व्हिला, राजेंद्रनगर**

कोल्हापूर येथील राजेंद्रनगर गॉडफादर व्हीला येथे लोकशाहीर अण्णा भाऊ साठे जयंती व लोकमान्य टिळक पुण्यतिथी साजरी करण्यात आली. मोहन मलबारी ायगर फोर्सचे अध्यक्ष शकील जमादार यांच्या हस्ते प्रतिमाचे पूजन करण्यात आले. यावेळी अण्णा भाऊ साठे याना 'भारत रत्न पुस्कार' देणेत यावा अशी मागणी या ठीम तर्फे करण्यात आली.

या कार्यक्रमास रिना प्रजावती, कविता चंदवाणी, ऋतुजा मोरे, मेघना खोटे, कविता मुल्ला, बयाजी सावंत, रवि गणेकर, रमेश थोरात,राजन शिंदे,संघटनेचे सदस्य उपस्थित होते.

पुढारी

# अण्णा भाऊ साठे यांना शिवाजी विद्यापीठात अभिवादन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवन इमारतीमध्ये कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते अण्णा भाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. तानाजी चौगुले, डॉ. धनंजय सुतार, डॉ. शरद बनसोडे, डॉ. रामचंद्र पवार आदी उपस्थित होते.

0 2 AUG 2025 सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## वर्धापन दिनाच्या हार्दिक शुभेच्छा...

Estd : 1962
'A++' *Accredited by* NAAC (2021)
with CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

• शेतकरी, कष्टकरी, वंचितासाठी कार्य करणारे विद्यापीठ •

• ग्रामीण भागात शिक्षणाची गंगा पोहोचविणारे विद्यापीठ •

• विविध पारंपारिक आणि आधुनिक अभ्यासक्रम राबविणारे ३६ अधिविभाग आणि २८९ संलग्नित महाविद्यालये •

• अद्ययावत सुविधांनी सुसज्ज कँपस • संशोधन क्षेत्रात व्यापक योगदान •

• कमवा आणि शिका व गरजेनुसार काम योजनेद्वारा विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाचे द्वार खुले करणारे विद्यापीठ •

• विद्यापीठ निधीतून गुणवत्ता शिष्यवृत्ती देणारे एकमेव विद्यापीठ •

• सुवर्णमहोत्सवी वर्षात यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपमेंट स्थापना •

• जैवतंत्रज्ञान व नॅनो तंत्रज्ञान अभ्यासक्रमाची विशेष सोय तसेच अन्न विज्ञान व तंत्रज्ञान विषयक विशेष अभ्यासक्रम •

• सुसज्ज आणि भव्य संगणकीकृत ग्रंथालय •

• विद्यार्थी व पालकांसाठी विशेष अपघात विमा सुरक्षा योजना •

• आंतरराष्ट्रीय दर्जाची क्रीडा संकुले •

• देशी – विदेशी विद्यापीठांसोबत सामंजस्य करारद्वारा विशेष शैक्षणिक प्रशिक्षण सुविधा •

• नियोजित वेळेत परीक्षा आणि विहीत वेळेत निकालाची परंपरा •

• जलस्वयंपूर्ण विद्यापीठ, हरित विद्यापीठ •

• www.unishivaji.ac.in •



महा न्यूज & व्ह्यूज

0 2 AUG 2025
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# बॅ. बाळासाहेब खर्डेकर यांना शिवाजी विद्यापीठात जयंतीनिमित्त अभिवादन




**कोल्हापूर, (महान्यूज अँड व्ह्यूज ):** शिवाजी विद्यापीठात आज बॅ. बाळासाहेब खर्डेकर यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले.विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राच्या इमारतीमध्ये कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते बॅ. खर्डेकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले.

यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. तानाजी चौगुले, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक डॉ. धनंजय सुतार, क्रीडा विभागाचे संचालक डॉ. शरद बनसोडे, आजीवन अध्ययन केंद्राचे संचालक डॉ. रामचंद्र पवार, इनोव्हेशन, इनक्युबेशन व लिंकेजिस केंद्राचे संचालक डॉ. सागर डेळेकर, गणित अधिविभागाचे डॉ. मच्छिंद्र गोफणे, डॉ. जे.बी. यादव, डॉ. प्रकाश बिलावर, डॉ. शिवराज थोरात, डॉ. राजेंद्र खामकर यांच्यासह प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महा न्यूज & व्ह्यूज

0 2 AUG 2025
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अण्णा भाऊ साठे यांची शिवाजी विद्यापीठात जयंती




कोल्हापूर (महा न्यूज अँण्ड व्ह्यूज ):

शिवाजी विद्यापीठात आज लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवन इमारतीमध्ये कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते अण्णा भाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. तानाजी चौगुले, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक डॉ. धनंजय सुतार, क्रीडा विभागाचे संचालक डॉ. शरद बनसोडे, आजीवन अध्ययन केंद्राचे संचालक डॉ. रामचंद्र पवार, इनोव्हेशन, इनक्युबेशन व लिंकेजिस केंद्राचे संचालक डॉ. सागर डेळेकर, इंग्रजी अधिविभागाचे डॉ. प्रभंजन माने, डॉ. अक्षय सरवदे, डॉ. तृप्ती करेकट्टी, डॉ. राजश्री बारवेकर, गणित अधिविभागाचे डॉ. मच्छिंद्र गोफणे, उपकुलसचिव गजानन पळसे, डॉ. प्रमोद पांडव, डॉ. उत्तम सकट यांच्यासह प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.